# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००६०५**

**अपिलार्थी श्री. इकलाक रहिम शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
बांद्रा विभाग, बांद्रा पोलीस स्टेशन कंपाऊंड,
बांद्रा (प), मुंबई- ४०० ०५०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ-९)**
हिल रोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई - ५०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०२.२०२२**

अपीलकर्ता : व्ही.सी.माध्यमाव्दारेउपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.११.२०२० | १४.१२.२०२० | २५.१२.२०२० | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ११.०२.२०२१ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश मिळालेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २६.११.२०२० अन्वये खालील माहिती विचारलेली आहे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १४.१२.२०२० अन्वये अपिलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

| मुद्दा | उत्तर |
|---|---|
| माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत महोम्मद मुनावर अली अशरफ अली सयद उर्फ साहिल यांनी काही दिवसापुर्वी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांच्या विरुध्द आपल्या पोलीस ठाण्यात एका लेखी स्वरुपात अर्जाव्दारे तक्रार दाखल केले होते. सदर तक्रार अर्जावर आपल्याकडून झालेल्या कार्यवाही बद्दलची माहिती व माहितीचे कागदपत्रांची छायांकित प्रत मिळावी. | सदरचे प्रकरण हे तपासाधिन असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(ज) अन्वये सदरची माहिती नाकारण्यात येत आहे. |

अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००६०५

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १४.१२.२०२० संलग्न केलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी असे सादर केले की, त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झालेले नाहीत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावे.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

मुंबई
दिनांक : ०७.०३.२०२२

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई